# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### भिसी, पुयारदंड (जि. चंद्रपूर) गावातील शेतक-यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ मंजूर करण्याबाबत

**(१) २ (०८-११-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिसी, पुयारदंड (जि. चंद्रपूर) गावातील शेतक-यांना सन २०१८-१९ मधील प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ मंजूर करण्याबाबत विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दादाजी भुसे (१९-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) खरीप हंगाम २०१८ मध्ये भिसी महसूल मंडळातील कापूस, तूर, भात व सोयाबीन या अधिसूचित पिकांकरीता शेतकऱ्यांनी सहभाग घेतला होता. योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कापूस पिकासाठी १०७ पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर रक्कम रु. १५.०४ लाख जमा करण्यात आली असून उर्वरित तूर, भात व सोयाबीन या पिकांचे सरासरी उत्पन्न हे उंबरठा उत्पन्नापेक्षा जास्त आल्यामुळे विमा नुकसान भरपाई देय होत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील विविध शहरांमध्ये क्रीडा व सांस्कृतिक वापरासाठी शासनाने दिलेल्या जमिनीबाबत

**(२) ५९८ (२७-०३-२०२०). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये क्रीडा किंवा सांस्कृतिक वापरासाठी राज्य शासनाकडून माफक दरात देण्यात आलेल्या जमिनीवर कोणतीही परवानगी न घेता किंवा मूळ

उद्देशाचे पालन न करता व्यावसायिक वापराचे हॉटेल, क्लब व इतर सेवा पुरविणारे व्यवसाय उभारल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मूळ उद्देशाचे नियम मोडून बेकायदेशीर व्यवसाय उभारणाऱ्या संस्था किंवा व्यक्ती यांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहे काय, तसेच त्या जमिनी शासन परत आपल्या ताब्यात घेणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात (०१-०१-२०२१) :** (१) व (२) मुंबई शहर व पुणे या दोन जिल्ह्यांमधील काही प्रकरणांमध्ये शासनाने घालुन दिलेल्या अटींचे पालन न करता सदर जमिनींचा वापर अन्य कारणास्तव होत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणांमध्ये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ५३ व ५४ नुसार कार्यवाही करण्यात येत आहे. उर्वरित महाराष्ट्रात अशी बाब नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्हयातील जिल्हा क्रीडा संकुलच्या विविध विकास कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३) ६९१ (०९-०४-२०२०). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील जिल्हा क्रीडा संकुलाच्या विविध विकास कामांसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी आराखडा (परिशिष्ट ब) तयार करुन शासनाकडे निधीसाठी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखडयास मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्यासाठी कुडाळ व मालवण तालुक्यांतील लोकप्रतिनिधींनी मा. क्रीडा व युवक कल्याण मंत्री यांच्याकडे दिनांक ८ जानेवारी २०२० रोजी वा त्यासुमारास विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**सुनिल केदार (१७-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही,

(२) याबाबत दिनांक ०८/०१/२०२० चे पत्र प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कांदिवली पश्चिम (मुंबई) येथील चारकोप सेक्टर ८ येथील कांदळवनात डेब्रिज व कचऱ्याचा ढीग जमा झाल्याबाबत**

**(४) १२४९ (०२-०४-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली पश्चिम, (मुंबई) येथील चारकोप सेक्टर ८, गोराई खाडी वरील ब्रिज परिसरात कांदळवन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कांदळवनात डेब्रिज व कचऱ्याचा ढीग जमा झाल्यामुळे त्या परिसरात दुर्गंधीचे वातावरण पसरले असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे पर्यावरणाची हानी होत असून अनेक तक्रारी करून सुध्दा महापालिका व कांदळवन विभाग दुर्लक्ष करीत आहे असे स्थानिकांचे म्हणणे आहे याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच डेब्रिज व कचऱ्याचा ढीग कांदळवनात भविष्यात जमा होऊ नये याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१७-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) मौजे कांदिवली, चारकोप येथील सेक्टर ८ मधील नमूद ठिकाणी कचऱ्याचे ढिग जमा झाल्याबाबत श्री. सुप्रिया रेगे यांची तक्रार विभागीय आयुक्त कोकण यांच्यामार्फत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या कार्यालयास प्राप्त झाली होती.

त्यानुषंगाने सदर जागेचे तलाठी सजा कांदिवली यांनी तक्रारदार समवेत दिनांक ०७.०२.२०२० रोजी स्थळपाहणी केली आहे. सदर जागा मौजे चारकोप, ता. बोरीवली येथील सर्वे क्र.४१(पै.) व मौजे कांदिवली, सर्वे.क्र.१४९(पै.) येथील असून या जमिनीवर कांदळवनास लागून असलेल्या रस्त्यावरुन अज्ञात व्यक्तीनी घरातील टाकाऊ फर्निचर, थर्माकॉल घरात दुरुस्तीचे काम करतेवेळी असलेल्या टाकाऊ लाद्या इ. रस्त्या लगतच्या कांदळवनात टाकल्याचे दिसून आले. तसेच तक्रारदार यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या सफाई कर्मचाऱ्यांमार्फत साफसफाई करुन घेत असल्याचे दिसून आहे.

विषयांकित मिळकतीवरील कांदळवनाचा ऱ्हास केल्याप्रकरणी मंडळ अधिकारी, बोरीवली यांनी यापूर्वीच अज्ञात इसमावर पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ च्या कलम १५(१)(२)अन्वये चारकोप पोलिस ठाणे येथे गुन्हा क्र.१०/२०१९, दि.१४.०१.२०१९ रोजी दाखल केला आहे. सदर जागेवर कांदळवनास लागून असलेल्या रस्त्याच्या बाजूने कुंपन नसल्याने तसेच दिवा बत्तीची सोय नसल्याने रात्री आंधारात टाकाऊ सामान टाकण्यात येत असल्याचे तक्रारदार यांनी निदर्शनास आणून दिले. त्यानुषंगाने सदर बाब बृहन्मुंबई महानगरपालिका आणि कांदळवन कक्ष यांना तहसिलदार बोरीवली यांनी कळविलेली आहे.

वन विभागाच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्रामध्ये डेब्रिज, घनकचरा टाकण्यात येऊ नये म्हणून सदर क्षेत्रात संरक्षक भिंत बांधण्याचे नियोजित आहे. तसेच वन विभागाच्या ताब्यातील संवेदनशील कांदळवन क्षेत्रात वारंवार गस्त घालण्यात येत आहे, असे कांदळवन कक्ष यांनी कळविले आहे.

---

## अजनी (जि. नागपूर) येथील कोचींग क्लासमधील विद्यार्थ्यीनींवरील अत्याचाराच्या गुन्हयांना प्रतिबंध घालण्याबाबत

**(५) १३५३ (२२-०३-२०२०). श्री.टेकचंद सावरकर (कामठी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अजनी (जि.नागपूर) येथील साईबल चौधरी नावाच्या शिक्षकाला कोचींग क्लासमधील विद्यार्थ्यीनींवर ४ महिन्यापासुन अत्याचार करीत असल्यामुळे अटक करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यीनींवरील अत्याचाराबाबत अनेक खाजगी क्लासेसच्या कोचींग शिक्षकांवर गुन्हे दाखल आहेत, हे ही खरे आहेत काय,

(३) असल्यास, उक्त शिक्षकांवर कारवाई करून विद्यार्थ्यीनींवरील अत्याचाराच्या गुन्हयांना प्रतिबंध बसण्यासाठी कायदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अनिल देशमुख (०१-०१-२०२१) :** (१) (२) व (३) सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून अजनी पोलीस स्टेशन येथे अपराध क्रमांक २१८/ १९ कलम ३५४ (ए), (सी), (डी), ३७६ (एफ) (एन), भा.दं.वि. सह कलम ४, १२ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम (पोक्सो) अन्वये दिनांक १२.११.२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीताला अटक करण्यात आली असून आरोपीविरूध्द मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

विद्यार्थ्यीनींवरील अत्याचाराच्या गुन्हयांना प्रतिबंध बसण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येत आहे :-

• नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत पोलीस स्टेशन निहाय कोचिंग क्लास संचालकाची बैठक घेण्यात येत आहे. सदर बैठकीत विद्यार्थ्यीनींच्या सुरक्षिततेे संदर्भात सर्व बाबींवर चर्चा करण्यात येत आहे.

• तसेच भरोसा सेल मार्फत पोलीस काका, पोलीस दिदी, दामीनी पथक मार्फत कोचिंग क्लास येथे भेट देण्यात येते. महिला पोलीस विद्यार्थ्यीनीं सोबत चर्चा करतात व त्यांच्या अडी अडचणी जाणुन घेतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील शेतक-यांना रब्बी पिकांसाठी विमा काढताना येत असलेल्या समस्या**

**(६) १४८० (२०-०३-२०२०). श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील शेतक-यांना रब्बी पिकांसाठी विमा काढताना अडचणी येत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांना पडताळणीत गट नंबर येत नसल्यामुळे विमा काढण्यास वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्राहक केंद्र संचालकाकडून शेतक-यांना तातडीने विमा काढण्यासंदर्भातील समस्या दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१९-०१-२०२१) : (**१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

रब्बी हंगाम २०१९-२० मध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत शेतकरी विमा काढण्यापासून वंचित राहिल्या बाबतची तक्रार प्राप्त झाली नाही.

रब्बी हंगाम २०१९-२० मध्ये अकोला जिल्हयात प्रधानमंत्री पिक विमा योजनेची अंमलबजावणी भारती अॅक्सा जनरल इं. कं. कंपनीमार्फत करण्यात आली. योजनेअंतर्गत तेल्हारा तालुक्यातील २६९७ शेतकरी अर्जदारांनी रक्कम रु. १३.५५ लाख विमा हप्ता भरुन ३०३२.६३ हे. क्षेत्र विमा संरक्षित केले आहे. संबंधित विमा कंपनीकडून पात्र एकूण १० लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर नुकसान भरपाई रक्कम रु. १.५७ लाख जमा करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) हंगाम सुरु होण्यापुर्वी संबंधित विमा कंपनी व जिल्हा प्रशासनामार्फत केंद्र संचालक, आपले सरकार सेवा केंद्र यांचे प्रशिक्षण आयोजित करुन मार्गदर्शन केले जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात पावसामुळे हरभरा, ज्वारी, मका या पिकांवर रोग व कीडीचा प्रादूर्भाव झाल्याबाबत**

**(७) १८०६ (२०-०३-२०२०). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे सप्टेंबर, ऑक्टोबर मध्ये झालेल्या पावसामुळे कित्येक लाख हेक्टर क्षेत्र नापेर राहिले असून आलेल्या हरभरा, ज्वारी, मका या पिकांवर रोग व कीडीचा प्रादुर्भाव झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदरहू रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१९-०१-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यात यावर्षी सप्टेंबर-ऑक्टोंबर महिन्यामध्ये झालेल्या पावसामुळे रब्बी पिकांची पेरणी उशिरा झालेली आहे. याउलट राज्यात रब्बी पिकांचे सर्वसाधारण क्षेत्र ५६.९३ लाख हे. असून प्रत्यक्ष लागवडीखालील क्षेत्र ५८.३९ लाख हे.आहे. ते सरासरी क्षेत्राच्या १०२.५७ टक्के आहे

हरभरा, ज्वारी, मका या पिकांवर रोग व किडींचा प्रादुर्भाव झाल्याचे माहे जानेवारी, २०२० च्यासुमारास निदर्शनास आले.

माहे जानेवारी २०२० मध्ये १६ ते २२ जानेवारी २०२० या आठवडयात मका व ज्वारी या पिकांवर अनुक्रमे २८ व २१ गावांत फॉल आर्मी वर्म किडीचा तर हरभरा पिकावर ३४३ गावात घाटे अळी व मर रोगाचा प्रादुर्भाव सर्वाधिक आढळून आला होता. हरभरा, ज्वारी व मका पिकासाठी माहे जानेवारी, २०२० मध्ये किड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्पातील निरीक्षणानुसार प्रादुर्भाव दिसताच सदरील गावांमध्ये शास्त्रज्ञांसमवेत अधिकारी व कर्मचारी यांनी क्षेत्रिय स्तरावर बैठका आयोजित करून शेतकऱ्यांना वेळेत मार्गदर्शन केले

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) फॉल आर्मी वर्म,घाटे अळी/मर रोग यांच्या नियंत्रणासाठी क्रॉपसॅप योजनेतून शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर कृषि विभागामार्फत शिफारस केलेल्या किटकनाशकांचा पुरवठा करण्यात आला.

शेतकऱ्यांना हरभरा, ज्वारी व मका पिकासाठी पीक पेरणी ते काढणीपर्यंत एसएमएस, वर्तमानपत्रे, भितीपत्रके, शेतकरी मेळावे, शेतकऱ्यांच्या बैठका, शेतीशाळा, इ. माध्यमातून प्रचार प्रसिध्दी व मार्गदर्शन करण्यात आले आहे. सदर सर्व बाबींचा अवलंब केल्यामुळे व्यववस्थापनाच्या केलेल्या विविध उपाययोजनांमुळे प्रादुर्भाव नियंत्रित करण्यात आला

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यात अवैध रेती चौरी प्रकरणात दोषीवर कारवाई करणेबाबत**

**(८) २०९७ (२२-०३-२०२०). श्री.राजू कारेमोरे (तुमसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यात अवैध रेती चोरी प्रकरणाची चौकशी करून तत्कालीन नायब तहसिलदार यांना निलंबीत न करता त्यांची तात्पुरती मोदा (जि. नागपूर) येथे बदली करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात तत्कालीन नायब तहसिलदारांसह सध्या कार्यरत तहसिलदार, मोहाडी हे सुद्‌धा दोषी असल्याचे चौकशी अहवालात नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोषी असूनही तत्कालीन नायब तहसिलदार यांना निलंबीत न करता विभागीय आयुक्त कार्यालयाने तात्पुरती बदली करण्याचे कारण काय तसेच सध्या कार्यरत तहसिलदार श्री. देशमुख यांच्यावर अद्यापही कार्यवाही का करण्यात आली नाही,

(४) तसेच, भंडारा जिल्हयातील अवैध रेती चोरीवर आळा बसण्याच्या दृष्टीने शासन तत्कालीन नायब तहसिलदार व कार्यरत तहसिलदार, मोहाडी यांच्यावर कारवाई करणार आहे काय व सदर प्रकरणाची चौकशी अतिरिक्त जिल्हाधिकारी, वर्धा यांच्याकडे असून अद्यापही चौकशीची कार्यवाही प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (३०-१२-२०२०) :** (१) (२) (३) व (४) भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यात अवैध रेतीचे उत्खनन व वाहतूक होत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारींची चौकशी करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, तुमसर यांना आदेशित करण्यात आले होते. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी, तुमसर यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या आधारे जिल्हाधिकारी भंडारा यांनी संबधित नायब तहसीलदार यांची बदली करण्याची शिफारस केली होती. त्यानुषंगाने विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या दि.२२.११.२०१९ रोजीच्या आदेशान्वये संबधित नायब तहसीलदार यांची तहसील कार्यालय मोहाडी येथून बदली करण्यात आली.

अवैध रेतीचे उत्खनन व वाहतूक होत असल्याच्या तक्रारीबाबत उपविभागीय अधिकारी, तुमसर यांनी जिल्हाधिकारी भंडारा यांना सादर केलेल्या अहवालानुसार संबधित तहसीलदार यांनी अनियमितता केल्याचे निदर्शनास येते. तसेच सिरसोली, ता.मोहाडी, जि.भंडारा येथील अतिक्रमण काढण्यात आल्याच्या प्रकरणातील अपर जिल्हाधिकारी, वर्धा यांच्या अहवालानुसार संबधित तहसीलदार तसेच संबधित नायब तहसीलदार यांनी अनियमितता केल्याचे निदर्शनास येते. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी, तुमसर व अपर जिल्हाधिकारी वर्धा यांच्या चौकशी अहवालास अनुसरुन अनियमिततेस जबाबदार असलेल्या संबधितांविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासाठीचा प्रस्ताव तातडीने शासनास सादर करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त, नागपूर यांना देण्यात आल्या आहेत

---

## नागपूर शहरात अवैध दारू, गांजा विक्री, सट्टा, कॅसिनो, लुडो आणि जुगाराचे अड्डे सुरु असल्याबाबत

**(९) २१४१ (२२-०३-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील २२ ठिकाणी अवैध दारू, गांजा विक्री, सट्टा, कॅसिनो, लुडो आणि जुगाराचे अड्डे सुरु असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आणि नागपूर शहरातील या अवैध अड्ड्यांवर कायदेशीर कारवाई करून याकडे दुर्लक्ष करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (०७-०१-२०२१) : (**१) नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत अवैध धंदे करणाऱ्यांविरुध्द माहे जानेवारी २०२० मध्ये मोहिम राबवून कडक कारवाई करण्यात आलेली असून आरोपींतांना अटक करुन त्यांचे जवळून अवैध दारु, गांजा, जुगाराचे साहित्य व रोख

जप्ती करण्यात आली आहे. सन २०२० नोव्हेंबर अखेरपर्यंत दाखल गुन्ह्याची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| प्रकार | केसेस | आरोपी | जप्ती माल | किंमत |
|---|---|---|---|---|
| दारु | २५५४ | २९५६ | अवैध दारु व इतर मुद्देमाल आणि नगदी | ४,२७,३५,००६ |
| जुगार कारवाई | ११२५ | ३९४७ | नगदी व साहित्य | ३,३४,८९,४७० |
| एनडीपीएस | ६३ | ११४ | गांजा, ब्राऊनशुगर, एमडी आणि ड्रग्ज | १,५६,१८,२०६ |

(२) होय, उपरोक्त दाखल गुन्ह्यांमध्ये आरोपींना अटक करुन सविस्तर तपास करण्यात आलेला आहे.

(३) नागपूर शहरात लपून छपून अवैध धंदे करणाऱ्यांच्या अड्ड्यांवर कायदेशीररित्या वेळीच रेड कारवाई करण्यात आलेली आहे. यामध्ये पोलीस अधिकाऱ्यांकडून कोणतेही दुर्लक्ष झालेले नसल्याने कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मलकापूर (जि. बुलढाणा) तहसील कार्यालयातील महिला कर्मचाऱ्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याबाबत

**(१०) २२५१ (२२-०३-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि. बुलढाणा) तहसील कार्यालयात एका महिला लिपिक कर्मचाऱ्याने दिनांक १५ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(३) असल्यास, महिला कर्मचाऱ्यांचा मानसिक छळ करून त्रास देणाऱ्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (११-०९-२०२०) :** (१) (२) व (३) श्रीमती अलका नंदु चव्हाण, लिपिक टंकलेखक, तहसिल कार्यालय, मलकापूर यांनी दि.१५.११.२०१९ रोजी कार्यालयात कर्तव्यावर असतांना विषारी औषध प्राशन करुन आत्महत्येचा प्रयत्न केला आहे, हे खरे आहे. सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, मेहकर यांनी केलेल्या कार्यालयीन चौकशीमध्ये श्रीमती अलका नंदु चव्हाण, लिपिक टंकलेखक यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्येचा प्रयत्न केल्याचे आढळून आलेले नाही. चौकशीमध्ये संबंधित निवासी नायब तहसिलदार यांच्या

अप्रत्यक्ष दबावामुळे कार्यालयातील बहुतांश कर्मचाऱ्यांनी त्यांच्या पत्नीकडून एल.आय.सी. पॉलीसी घेतली असल्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे संबंधित निवासी नायब तहसिलदार, मलकापूर यांची मलकापूर उपविभागाबाहेर प्रशासकीय कारणास्तव बदली प्रस्तावित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) पुणे विभागीय क्रीडा व युवक सेवा, उप संचालक कार्यालयात झालेला गैरप्रकार**

**(११) २६२७ (०९-०४-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) पुणे विभागीय क्रीडा व युवक सेवा, उप संचालक कार्यालयात तीन तत्कालीन उप संचालकांनी अधिकारी व कर्मचारी यांचेबरोबर आर्थिक संगनमत करुन सन २०१५ ते २०१७ या तीन वर्षात लष्कर, शिपाई, चौकीदार, सफाई कामगार, वाहन चालक, कनिष्ट लिपीक इत्यादी ५० हून अधिक पदे बेकायदा व नियमबाह्यरित्या सरळ सेवा पद्धतीने भरण्यात आल्याचा गैरप्रकार निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) पुणे यांचे अखत्यारितील ५७ महाराष्ट्र बटालियन, राष्ट्रीय छात्र सेना, अहमदनगर येथील लष्कर या पदावर काम करणारे श्री. एस.जी. बाचकर (दिव्यांग) हे दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीसाठी पात्र असतानाही उप संचालकाने श्री. बाचकर यांना वाहन चालक या अयोग्य पदावर पदोन्नती देऊन त्यांचेवर अन्याय केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (१६-१२-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे. राष्ट्रीय छात्र सेनेच्या पुणे विभागीय क्रीडा व युवक सेवा, उपसंचालक कार्यालयात अनियमितता झाल्याची बाब निदर्शनास आली आहे.
(२) नाही.
(३) यासंदर्भात आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या स्तरावरुन चौकशी सुरु असून चौकशीअंती पुढील कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**निफाड (जि.नाशिक) तहसील कार्यालयातील कर्मचा-यांच्या कामात अनियमितता असल्याबाबत**

**(१२) २६४५ (२२-०३-२०२०). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील तहसिलदार, दीपक पाटील यांच्यासह कर्मचाऱ्यांच्याही कामात अनियमितता, कामांत त्रुटी व नोंदीमध्ये फेरफार केल्यामुळे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान जिल्हाधिकारी यांनी त्यांना समज दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निफाड येथील तहसिलदार, दीपक पाटील यांच्या मनमानी कारभाराबाबत स्थानिक नागरीकांच्या अनेक तक्रारीही असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयात सेवा हमी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी व्हावी तसेच नागरीकांची कामे प्रलंबित न ठेवण्याबाबत दक्षता घ्याव्या अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी तहसिलदार व कर्मचारी यांना देऊनही अद्यापी तलाठी कार्यालयापासून उपविभागीय कार्यालयांपर्यंत अनेक ठिकाणी नागरीकांना समाधानकारक सेवा मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कामकाजात अनियमितता व नागरीकांना सेवा उपलब्ध न करणाऱ्या निफाड येथील तहसिलदार दीपक पाटील यांची रितसर चौकशी करुन त्यांचेवर फौजदारी कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१०-०९-२०२०) : (**१), (२), (३) व (४) विभागीय आयुक्त, नाशिक यांनी तत्का. तहसीलदार निफाड यांच्या अनियमिततेबाबत शासनास अहवाल/ प्रस्ताव सादर केला असून सदर प्रस्तावाची छाननी करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या दिनांक २६/०१/२०२० च्या प्रारुप अधिसुचनेमध्ये महाराष्ट्र लोकसेवा हमी कायदा अधिनियम, २०१५ अंर्तगत पुरविण्यात येणा-या सेवा व्यतिरिक्त इतर पुरविण्यात येणा-या सेवांमध्ये तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यास्तरावरील सेवांचा अंर्तभाव करण्यात आला असून त्याअनुषंगाने जिल्हास्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीमती तृप्ती मनोज कुळमेथे या आदिवसी महिलेला न्याय मिळण्याबाबत**

**(१३) २८३१ (२२-०३-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीमती तृप्ती मनोज कुळमेथे या आदिवसी महिलेवर झालेला प्राणघातक हल्ला व अत्याचारासंदर्भात न्याय मिळण्याबाबत विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी पोलिस अधिक्षक, चंद्रपूर यांचेकडे दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१४-१२-२०२०) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन रामनगर येथे अपराध क्रमांक १२/२०२० कलम ३२६, ३५४ (ब), ५०४, ३४ भादवी सहकलम ३ (१) (E), ३(१) (w) (i), ३, २ (v a), अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ व सुधारणा अधिनियम २०१५ अन्वये ०४ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे. नमुद गुन्ह्यातील चार आरोपीतांना अटक करण्यात आली असून सध्या आरोपी हे न्यायालयीन कोठडीत आहे. आरोपींविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सद्यस्थितीत सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील पुरग्रस्त शेतक-यासांठी दिल्या जाणा-या बियांणासाठी शेतकऱ्यांना दोनशे ते तीनशे रुपये दयावे लागत असल्याबाबत**

**(१४) २८८९ (२०-०३-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयात महापुरात पिके गमावून आर्थिक झळ बसलेल्या पुरग्रस्त शेतक-यासांठी शासनातर्फे मोफत बियाणे वाटप करण्यात आली होती परंतु या मोफत बियाणांचे शेतक-यांना दोनशे ते तीनशे रुपये मोजावे लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बियाणाच्या पिशवीवर विक्रीसाठी नाही सियाममार्फत पुरग्रस्तांसाठी मदत असे छापले असतांना प्रत्यक्षात यासाठी शेतक-यांकडून दोनशे ते तीनशे रुपये घेण्यात येत आहे व त्याची पावतीही दिली जात नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (३१-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही,
(३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

**पुणे शहरातील निबंधक कार्यालयात नागरीकांकडून सक्तीने ध्वजनिधी संकलन केल्याबाबत**

**(१५) ३२८४ (२२-०३-२०२०). श्रीमती मुक्ता टिळक (कसबापेठ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील निबंधक कार्यालयात दस्त नोंदणीसाठी आलेल्या नागरीकांकडून अधिकारी सक्तीने ध्वजनिधी संकलन करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात (२४-१२-२०२०) : (**१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत चित्रपट, मालिकांमध्ये भूमिका देण्याच्या नावाखाली सेक्स रॅकेटचे प्रमाण वाढत असल्याबाबत.**

**(१६) ३५४८ (२२-०३-२०२०). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत चित्रपट, मालिकांमध्ये भूमिका देण्याच्या नावाखाली तरुणींना वेश्या व्यवसायात ढकलणाऱ्या कास्टिंग डायरेक्टरासह निर्मिती व्यवस्थापकाला समाजसेवा शाखेने अटक केल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एका ब्रॅण्डच्या जाहिरातीसाठी परदेशी मुली हव्या व शरीरसंबंध ठेवावे लागतील असे सांगून वेश्या व्यवसायात ढकलल्याची माहिती समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, मुंबई शहरातील अशा प्रकारच्या घटना रोखण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

**श्री. अनिल देशमुख (०१-०१-२०२१) :**(१) समाजसेवा शाखेच्या पथकास गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने माहे जानेवारी २०२० व त्यादरम्यान पीडित मुलींना वेश्या व्यवसायाकरीता प्रवृत्त केल्यासंदर्भात खालील नमुद पोलीस ठाणेच्या हद्दीत समाजसेवा शाखेच्या कारवाई मध्ये गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुरक्र / कलम |
|---|---|---|
| १) | जुहू | गु.र.क्र. ०४/२०२०, कलम ३७०(३), ३४ भा.दं.वि. सह कलम ३,४,५ अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ |
| २) | वर्सोवा | गु.र.क्र. १८/२०२०, कलम ३७०(३), ३४ भा.दं.वि. सह कलम ३,४ पिटा ॲक्ट १९५६ |
| ३) | अंधेरी | गु.र.क्र. ४७/२०२०, कलम ३६६(अ), ३७० (१) (अ) (१), ३७० (ड), ३४ भा.दं.वि. सह कलम ३,४,५ पिटा ॲक्ट १९५६ |
| ४) | अंधेरी | गु.र.क्र. ५४/२०२०, कलम ३७० (३), ३४ भा.दं.वि. सह कलम ३,४,५ पिटा ॲक्ट १९५६ |
| ५) | कांदिवली | गु.र.क्र. २९/२०२०, कलम ३७० (१) (अ), ३४ भा.दं.वि. सह कलम ४,५ पिटा ॲक्ट १९५६ |

(२) असा कोणताही प्रकार घडल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) उपरोक्त नमूद गुन्हयांमधील जुहू येथील गुन्हयामध्ये एक आरोपीताला अटक करण्यात आली. वर्सोवा येथील गुन्हयात एक आरोपीला अटक करण्यात आली. तसेच अंधेरी पोलीस ठाणेमध्ये नोंदविण्यात आलेल्या गुन्हयांमधील पहिल्या गुन्हयातील महिला आरोपी व दुस-या गुन्हयातील वेश्यादलाल आरोपीत यांना अटक करण्यात आली आहे. तसेच कांदीवली येथे घडलेल्या गुन्हयातील तीनही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

(५) अनैतिक व्यापारास प्रतिबंध घालण्याबाबत करण्यात आलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत :-

(i) मुंबई शहरात स्पा, हॅाटेल, खाजगी फ्लॅट या ठिकाणी देहविक्री करीत असल्याची माहिती प्राप्त झाल्यास समाजसेवा शाखा, गुन्हे शाखा, मुंबई विभाग हे बोगस ग्राहकामार्फतीने वेळोवेळी धाडी टाकून देह विक्री करण्यास प्रवृत्त

करणा-या इसमांविरूध्द भारतीय दंड संहिता व अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा अन्वये कारवाई करण्यात येते.

(ii) पोलीस ठाणे हद्दीतील कार्यन्वीत कुंटनखाने, Escorts Service च्या नावाने जाहिरात करून वेश्याव्यवसायासाठी मुंबईतील हॅाटेलमध्ये वेश्यागमनाकरीता

मुली पुरविणा-या वेबसाईटधारक व वेश्यादलाल यांचे विरूध्द भा.दं.वि.सं व अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा अन्वये कारवाई करण्यात येते.

(iii) बृहन्मुंबई शहरातील सर्व पोलीस ठाणेतील पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचेसाठी अनैतिक व्यापार संबंधित काम करणा-या वेगवेगळ्या समाजसेवी संघटनांचे प्रतिनिधी (एन.जी.ओ.), कायदे तज्ञ, अनैतिक मानवी वाहतुक कक्ष, मुंबई येथे कार्यरत असलेले अनुभवी पोलीस अधिकारी यांच्या मार्फतीने कार्यशाळांचे आयोजन करून त्यांना पोलीस ठाणे हद्दीतील कार्यन्वीत कुंटनखाने, Escorts Service चे वेबसाईटधारक व वेश्यादलाल यांचे विरूध्द परिणामकारक कशा प्रकारे कारवाई कराव्यात याबाबत मार्गदर्शन देण्यात येते.

---

**भांबुर्डी (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील पशुवैद्‌यकीय दवाखान्यात लसीकरण मोहिम पुर्ण करण्याबाबत**

**(१७) ४०१८ (१०-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांबुर्डी (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथे जनावरांच्या लसीकरण मोहिमेला महिना पूर्ण झाला तरी पशुवैद्‌यकीय दवाखान्याच्या क्षेत्रातील लसीकरण मोहिम पूर्ण होत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात सुमारे १३२५० जनावरांपैकी केवळ ५३०० जनावरांचे लसीकरण पूर्ण झाले असुन रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास लसीकरण न झाल्यामुळे जनावरांचे रोग नियंत्रणात राहू शकत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लसीकरण हे कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे होत नसल्याने जनावरांचे रोग मोठ्या प्रमाणात वाढत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन भांबुर्डी येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात लसीकर मोहिम पुर्ण करुन तसेच सदर प्रकरणात जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (०७-०१-२०२१) :** (१) (२) व (३) पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर या दवाखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये एकूण ०५ गावांचा समावेश असून, त्यातील भांबुर्डी (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथे लाळ खुरकुत रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत दि.५.११.२०१९ ते दि.२३.१२.२०१९ या कालावधीत एकूण २,९०८ गाय-म्हैस वर्गापैकी २,८०० जनावरांना लाळ खुरकुत रोग प्रतिबंधक लसीकरण करण्यात आलेले आहे.
उक्त पशुवैद्यकीय संस्थेच्या कार्यक्षेत्रातील एकूण १३,२५० गाय-म्हैस वर्गातील जनावरांना लसीकरण करण्यात आलेले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्रीपुर (ता.माळशिरस,जि.सोलापूर) येथील शेती महामंडळाच्या मळ्यांतर्गत असलेल्या जमिनीबाबत**

**(१८) ४०४७ (२३-०३-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीपुर (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील शेती महामंडळाच्या मळ्यांतर्गत असलेल्या जमिनी काही वर्षापूर्वी मुळ शेतकऱ्यांना वाटप करण्यात आल्यानंतरही शिल्लक जमीन भाडे तत्वावर देण्यात आल्या असून यातील काही करारदार मनमानी कारभार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, करारदाराने पाटबंधारे विभागाची कोणतीही परवानगी न घेता निरा-उजवा कालवा खंडाळी शाखेअंतर्गत येणाऱ्या फाटा क्र-२४ ला अनधिकृत नविन वितरिका काढली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू गंभीर प्रकरणाकडे पाटबंधारे विभागाचे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनामार्फत संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात (११-१२-२०२०) :** (१) पात्र माजी खंडक-यांना जमीन स्वकसवणुकीसाठी परत केल्यानंतर उर्वरित क्षेत्रावर महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडून संयुक्त शेती करण्यात येत असून श्रीपूर मळा येथील संयुक्त शेतीधारक श्री. कृष्णकांत वसंतराव रासकर यांना शेतीला पाणी घेण्यासाठी नवीन दार/विमोचक तयार केले होते, हे खरे आहे.
(२) सदर ठिकाणी अनधिकृत वितरीका काढली नसून शेती महामंडळाने त्याची जमीन करारावर श्री. कृष्णकांत वसंतराव रासकर यांना कसण्यासाठी दिलेली असून श्री. रासकर यांनी निरा-

उजवा कालवा शाखा क्र.१ वरील वितरीका क्र.२४ वर सा.क्र.-५५०० मीटरवर विनापरवाना अनधिकृतरित्या विमोचकाचे बांधकाम केले होते.

(३) कार्यकारी अभियंता, निरा-उजवा कालवा, फलटण यांनी क्षत्रीय पाहणी केली व त्यानंतर सदरचे अनधिकृत विमोचक काढून टाकण्यात आले आहे.

(४) सदर प्रकरणी सहायक अभियंता (श्रेणी-१), पाटबंधारे उपविभाग, माळशिरस यांच्यावर शिस्तभंग विषयक कारवाई प्रस्तावित करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**दुधाचे उत्पादन प्रतिदिन २ लाखांवरुन ५ लाख लिटरपर्यंत वाढविण्याबाबत**

**(१९) ४१०९ (०९-०४-२०२०). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ, मराठवाडयात दुधाचे उत्पादन प्रतिदिन २ लाखांवरुन ५ लाख लिटरपर्यंत वाढविण्याबाबतची सुचना मा.मुख्यमंत्री महोदंयानी दिली असुन याबाबत अंमलबजावणी केव्हापर्यंत होणार आहे,

(२) तसेच, वरळी दुध डेअरीची सद्यस्थिती काय असुन दुधपुरवठा (वरळी दुध डेअरीत) कमी होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (०७-०१-२०२१) : (**१) विदर्भ व मराठवाडा विभागातील दुध उत्पादन वाढीकरिता राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ यांच्या सहकार्याने विदर्भ व मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पाची सन २०१७-१८ पासून अंमलबजावणी करण्यात येत असून, याअंतर्गत एकूण रू.४५.७२ कोटी निधी प्रत्यक्ष वितरित करण्यात आलेला आहे.

(२) वरळी दुग्ध शाळेअंतर्गत प्रतिदिन सरासरी १८,००० लि. पिशवीबंद दुधाचे वितरण करण्यात येत आहे. बृहन्मुंबईमध्ये अंदाजे ७० ते ७५ ब्रँडचे दुध मुबलक प्रमाणात उपलब्ध असून, ग्राहकांना आकर्षित करणा-या अनेक उपाययोजना त्यांच्याकडून केल्या जातात. तसेच, या दुध कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणात जाहिराती करण्यात येतात. त्यामुळे असे दुध घेण्याकडे ग्राहकांचा कल आहे.

बृहन्मुंबई दुध योजनेत ग्रामीण भागातून येणा-या दुध पुरवठ्यामध्ये अनिश्चितता राहून त्याचा परिणाम वरळी दुग्ध शाळेतून होणा-या दैनंदिन दुध वितरणावर झालेला आहे.

(३) ग्राहकांना विविध ब्रँडचे दूध बाजारात / घरपोच उपलब्ध असून शहरांत दुधाचा कोठेही तुटवडा नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगोल्याच्या बाजारातून खिल्लार जनावरांसह भाकड जनावरेही मोठ्या प्रमाणात आणण्यात येत असल्याबाबत**

**(२०) ४४४५ (१३-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्रात जातिवंत खिल्लार जनावरांसाठी प्रसिद्ध असलेला बाजार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सांगोल्याच्या बाजारातून खिल्लार जनावरांसह भाकड जनावरेही मोठ्या प्रमाणात आणण्यात येत असल्याने कत्तल खाण्याला कसाईचे रूप आल्याचे निदर्शनात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जनावरांच्या चारा छावण्या बंद झाल्याने चारा उपलब्ध नसल्यामुळे शेतकरी नाईलाजाने कवडीमोल दराने कसायाला विकत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सामाजिक जागृती व पोलिसांकडून कठोर कारवाई होत नसल्याने राजरोसपणे कत्तल खाण्यात दिवसेंदिवस जनावरांची संख्या वाढत आहे , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे ?

**श्री. सुनिल केदार (०१-०१-२०२१) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) ऑक्टोबर, २०२० अखेर सांगोला तालुक्यामध्ये ३७५.६१ मि.मि. पाऊस झाल्याने वाळलेला चारा व हिरवा चारा चारा उपलब्ध असल्याने चारा छावण्या उघडण्याची गरज भासलेली नाही.

(३) राज्यात दिनांक ४ मार्च,२०१५ महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम,१९९५ म्हणजे गोवंश हत्याबंदी कायदा लागू असल्यामुळे गोवंश कत्तलीस प्रतिबंध आहे.

संशयास्पद प्रकरणांमध्ये पोलीस विभागाकडून वेळोवेळी कार्यवाही केली जात असून माहे ऑगस्ट, २०१९ ते ऑक्टोबर, २०२० या कालावधीत महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा), अधिनियम, १९९५ अंतर्गत ७ गुन्हे दाखल केले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नेवाळी (ता.अंबरनाथ) येथे नविन सुसज्ज पोलिस स्टेशन उभारणेबाबत**

**(२१) ४५५९ (२४-०३-२०२०). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ तालुक्यातील श्रीमलंग विभागामध्ये लोकवस्ती मोठया प्रमाणात वाढत असल्यामुळे या भागात चोरी, खुन व लुटमारीचे प्रकार मोठया प्रमाणात वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात जवळपास पोलिस स्टेशन नसल्याने नागरीकांना तक्रार करण्यासाठी लांब अंतरावर जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नेवाळी (ता.अंबरनाथ) येथे नविन सुसज्ज पोलिस स्टेशन उभारणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीकडुन वारंवार मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वाढत्या गुन्हेगारीला प्रतिबंध घालण्यासाठी नेवाळी येथे नविन पोलिस स्टेशन सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (११-१२-२०२०) :** (१) होय.
श्रीमलंग विभाग/नेवाळी-हाजीमलंग पहाड परिसरात सन २०१५ ते २०१९ या कालावधीत खुन तसेच चोरीच्या गुन्ह्यांची संख्या १३८ आहे. तसेच नेवाळी चौकीच्या हद्दीतील सन २०१८ मध्ये एकूण ८६ गुन्हे दाखल असून त्यापैकी ७१ गुन्हे उघड आहेत. तसेच सन २०१९ मध्ये एकूण ९९ गुन्हे दाखल असून त्यापैकी ५९ गुन्हे उघड आहेत.
(२) होय.
(३) होय.
(४) नेवाळी परिसरातील बहुतांश जमीन ही भारतीय नौदलाच्या मालकीची असल्याने नेवाळी येथे पोलीस स्टेशन बांधण्यासाठी नागरीकांना सोयीची जागा मिळण्यासाठी वेस्टर्न नेव्हल कमांड, मुंबई यांच्याशी पत्र व्यवहार करण्यात आला असून, त्यांचे उत्तर प्रतिक्षाधीन आहे. सद्य:स्थितीत आकृतीबंधात नेवाळी पोलीस स्टेशनचा समावेश नाही.
(५) प्रश्न उद्भभवत नाही.

---

## सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(२२) ४९३४ (०४-०४-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रा बुद्रुक (ता.सेनगाव,जि.हिंगोली) परिसरातील हळदीच्या पिकावर करपा रोगाचा प्रार्दुभाव झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्रा बुद्रुक ताकतोडा, जामठी बुद्रुक, गोधनखेडा, कहाकर बुद्रुक, वरखेडा, केंद्रा खुर्द, हिवरा, माहेरखेडा, बहवाडी, मन्नास पिंपरा, वालना आदी भागातील सोयाबीन, कापूस, तुर या पिकांचे परतीच्या पावसाने नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सेनगाव तालुक्यातील उक्त परिसरातील पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. दादाजी भुसे (१९-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) केंद्रा बु. येथे १५ हेक्टर क्षेत्र हळद पिकाखाली असून ऑक्टोबर-नोव्हेंबर, महिन्यात वातावरण बदलाने अतिथंडी व अवेळी पाऊस पडल्याने हळद पिकावर अनेक रोगांपैकी करपा रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला होता. परंतू करपा रोगाच्या प्रादुर्भावाची टक्केवारी ३३ टक्के खाली होती. सदर रोगाच्या नियंत्रणासाठी २९ गावांमध्ये शेतीशाळा, गावबैठका घेऊन प्रचार प्रसिद्धी करण्यात आली. तसेच कृषि विज्ञान केंद्र तांडापूर व वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी येथील शास्त्रज्ञांच्या मदतीने वेळोवेळी प्रक्षेत्रावर भेटी देवून पिकाच्या प्रत्येक अवस्थेत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतात जावून किड रोगाविषयी मार्गदर्शन केले. सदर मार्गदर्शनामध्ये करपा रोगाच्या नियंत्रणाकरिता डायथेन एम-४५, ३० ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सी क्लोराईड ३० ग्रॅम किंवा प्रोपीकॅनॉझॉल २५ इसी १० मिली प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारावे असा संदेश कृषि विभागाच्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत देण्यात आला. तसेच वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विदयापीठ परभणी व कृषि विज्ञान केंद्र, तोंडापूर येथील शास्त्रज्ञाचे केंद्रा बु. व परिसरातील हळद पिके घेणाऱ्या शेतक-यांच्या शेतावर प्रत्यक्ष भेट देऊन मार्गदर्शन करण्यात आले. या मार्गदर्शनामुळे सदर रोग नियंत्रणात आले.

ऑक्टोंबर २०१९ मध्ये अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकासाठी सेनगाव तालुक्यातील नुकसानग्रस्त ६५७२७ शेतकयांच्या ६५२२५ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी शासनाकडून ५१.८१ कोटी रुपये नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे माहे-ऑक्टोंबर व नोव्हेंबर २०१९ मध्ये सेनगाव तालुक्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे खरिप २०१९ मध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजने मध्ये सहभागी झालेल्या एकुण २७७५९ शेतकऱ्यांपैकी २६३३० शेतकऱ्यांना सोयाबीन, कापुस, ज्वारी, तुर या पिकासाठी पीक विमा रक्कम रु. १६.७३ कोटी विमा कंपनीने अदा केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लातूर जिल्हयात रब्बी ज्वारी या पिकावर रोगाच्या प्रादुर्भावामुळे झालेले नुकसान

**(२३) ४९९९ (०५-०४-२०२०). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयात रब्बी ज्वारी या पिकावर रोगाच्या प्रादुर्भावामुळे ज्वारीचे उत्पादन धोक्यात आले असून ज्वारीच्या पोंग्यात अळीच्या आक्रमणामुळे ज्वारीचे उत्पन्न कमी आले असुन रब्बी पिकांवरील पिकविमा देखील भरुन घेतला नसल्याने पिकांना संरक्षण न मिळाल्यामुळे शासनाने बाधित ज्वारीला आपली निवारणातून नुकसान भरपाई दयावी अशी मागणी ज्वारी उत्पादन शेतकऱ्यांनी दिनांक १६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास तहसिलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने लातूर जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील किती शेतकऱ्यांचे नुकसान झाले असुन आतापर्यंत किती रुपयांची प्रत्येकी मदत देण्यात आली वा देण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१९-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.
लातुर जिल्हयासाठी केंद्र शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही विमा कंपनीकडून निविदा प्राप्त न झाल्याने प्रधानमंत्री पिक विमा योजना लातूर जिल्हयात रब्बी हंगाम २०१९-२० मध्ये राबविण्यात आली नाही.

रब्बी हगामामध्ये काही भागांमध्ये रब्बी ज्वारी या पिकावर काही ठिकाणी प्रादुर्भाव दिसून आला. तथापि त्या संदर्भात क्षेत्रीच कर्मचाऱ्यांनी नियंत्रणाने विविध उपाय सुचवून त्यानुसार पिक संरक्षण केल्यामुळे सदर किड नियंत्रणात आलेली आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे विभागातील २७ तहसीलदाराची चौकशी सुरू असल्याबाबत**

**(२४) ५९८१ (२७-०३-२०२०). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कामांमध्ये दिरंगाई करणाऱ्या त्याचबरोबर नियमबाहय काम करणाऱ्या पुणे विभागातील २७ तहसीलदारांची पुणे विभागीय आयुक्त यांच्याकडून चौकशी सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोषी तहसीलदारांची बढती करू नये याबाबत कोर्टाने निकाल दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोषी तहसीलदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१०-०९-२०२०) :** (१) शासकीय कामात दिरंगाई करणा-या त्याचबरोबर नियमबाहय काम करणा-या पुणे विभागातील सुमारे ४८ तहसीलदार यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा ( शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ तसेच नियम १० अन्वये विभागीय चौकशीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) व (३) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक १५/१२/२०१७ मधील तरतुदीनुसार ज्या अधिकारी/ कर्मचारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशी तसेच फौजदारी कार्यवाही सुरु आहे त्यांना पदोन्नती देण्यात येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तळेगाव (ता. तेल्हारा, जि.अकोला) बाजार परिसरात सततचा पाऊस व रोग अळींच्या प्रादुर्भावामुळे पिकांचे झालेले नुकसान**

**(२५) ७३९८ (०७-०४-२०२०). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगाव (ता. तेल्हारा, जि.अकोला) बाजार परिसरात मागील एक महिन्यापासून सततच्या

बदलत्या वातारणामुळे शेतातील तुर, हरभरा या पिकांवर रोग अळींच्या प्रादुर्भावामुळे पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तळेगाव बाजार परिसरात सततच्या पावसामुळे शेतातील तुर, हरभरा, सोयाबीन, ज्वारी, मुग, उडीद, तीळ या पिकांचे नुकसान झाल्याने ही सर्व पिक शेतकऱ्यांच्या हातुन गेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन तळेगाव बाजार परिसरात सततचा पाऊस व रोग अळींच्या प्रादुर्भावामुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिकविमा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१९-०१-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

तेल्हारा, जि. अकोला तालुक्यात माहे डिसेंबर २०१९ मध्ये तूर पिकावर घाटे आळीचा ३ गावांत, शेंगा पोखरणाऱ्या आळीचा ३ गावांत तर शेंग माशीचा १ गावात प्रार्दुभाव आढळून आला, तसेच हरभरा पिकावर घाटे आळीचा १ गावात तर मर रोगाचा ३ गावांत प्रार्दुभाव आढळून आला होता, तथापि किड व्यवस्थापनाच्या केलेल्या विविध उपाय योजनांमुळे प्रार्दुभाव सध्या नियंत्रणात आहे.

(२) होय हे खरे आहे.

माहे ऑक्टोबर - नोव्हेंबर, २०१९-२०२० मध्ये क्यार व महाचक्रीवादळामुळे झालेल्या परतीच्या पावसामुळे तेल्हारा तालुक्यातील १०६ गावांमधील ३७३८३ शेतकऱ्यांचे ४६१७९ हेक्टर क्षेत्र ३३ % पेक्षा जास्त नुकसानग्रस्त झाले आहे.

(३) योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार खरीप हंगाम २०१९ मध्ये हिवरखेड या महसूल मंडळातील (तळेगाव बाजार परिसर) सर्व अधिसुचित पिकांकरीता एकूण १५९८ पात्र शेतकऱ्यांना रक्कम रु. ९३.७६ लाख नुकसान भरपाई संबंधित विमा कंपनीमार्फत लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माझगांव (मुंबई) येथील शिवदास चापशी मार्ग, सी.एस. क्र. १२६ मधील जागेची विक्री अनधिकृत ट्रस्टींनी शासनाची परवानगी न घेता केल्याबाबत**

**(२६) १०३५७ (०३-०६-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माझगांव (मुंबई) येथील शिवदास चापसी मार्ग, सी.एस. क्र. १२६ मधील दिनांक ३१ मार्च, २००२ रोजी वा त्यासुमारास भाडेपट्टा संपुष्टात आलेली मालमत्ता सन १९७६ नंतर पी.आर.कार्डवर नांव नसलेल्या अनधिकृत ट्रस्टी सदस्यांनी शासनाची परवानगी न घेता संस्थेची ८७१४ चौ.मी. क्षेत्रफळाची परस्पर खाजगी विकासकास विक्री करुन शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी व त्यानंतर अनेक लोकप्रतिनिधींनी चौकशी व कारवाईची लेखी पत्राद्वारे मागणी करुनही सदरचे प्रकरण संबंधित अधिकारी यांनी उच्च स्तरावरून दडपून टाकल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन विकासकाविरुद्ध कारवाई करण्याबाबत तसेच संपूर्ण ८७१४ चौ.मी. क्षेत्राचा भूखंड त्वरीत शासन जमा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात (३१-०७-२०२०) :** (१) माझगांव महसूल विभागातील भूकर क्र.१२६ मधील भाडेपट्टयाचे क्षेत्र १३९९ चौ.मी.व पेन्शन ॲन्ड टॅक्स चे क्षेत्र ३१८२.२३ चौ.मी. असे एकूण ४५८१.२३ चौ.मी. क्षेत्र मे.कच्छी लोहाना निवास गृह ट्रस्ट, माझगांव यांनी दि.२४.५.२०१० चे Deed of Conveyance अन्वये मे. गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स प्रा.लि.यांना विकले आहे. सदर क्षेत्रापैकी भूकर क्र.१२६ या मिळकतीमधील शासनाच्या मालकीच्या १३९९ चौ.मी. क्षेत्राची मे.गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स यांना बेकायदेशीर विक्री केल्याचे आढळून आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर प्रकरणी गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्र.४६६/२०१६ मध्ये मा.उच्च न्यायालयाने प्रकरण शासनाकडे वर्ग करुन, सुनावणी करीता आदेशीत केले होते. सदर मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाने या प्रकरणी सर्व संबंधितांना शासन स्तरावर सुनावणीची संधी देवून दिनांक १.१२.२०१८ रोजीचे ज्ञापनान्वये माझगांव महसूल विभागातील भूकर क्र.१२६ चा भाग असलेली १३९९ चौ.मी. क्षेत्राची शासकीय भाडेपट्टयाची मिळकत अटी व शर्तीचा भंग केला असल्यामुळे शासन जमा करण्यात येत असल्याचे आदेश पारित केले आहेत. या आदेशानुसार जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालयाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ५३(२) व ५४ खाली इमारतीचा रितसर ताबा घेवून मिळकतीच्या १३९९ चौ.मी. क्षेत्रास महाराष्ट्र शासनाचे नाव दाखल करण्यात आलेले आहे. सदर कार्यवाही विरुध्द संबंधित ट्रस्ट व विकासक यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.१८३९/२०१९ व रिट याचिका क्र.१५०/२०१९ दाखल केली आहे.
(४) सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

### धनकवडी (ता.हवेली,जि.पुणे) येथील सर्व्हे नं.३७/१४ या जमिनीचे बनावट खरेदीखत केल्याबाबत

**(२७) ११३१६ (१२-०९-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धनकवडी (ता.हवेली, जि.पुणे) येथे तलाठी सजा अंतर्गत बनावट खरेदीखत नोंदी, वारसनोंदी झाल्या असून धनकवडी येथील सर्व्हे नं.३७/१४ या जमिनीच्या बनावट

खरेदीखताची ही बाब माहे जून, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दस्त नोंदणी करतांना मूळ मालक, शेतकरी, साक्षीदार व जमीन घेणारे यांच्या मूळ कागदपत्रांची पूर्ण शहानिशा न करता बनावट खरेदीखत, साठेखत व कुलमुखत्यार दस्त करण्यात येत असून याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच तलाठी सजा खेड शिवापूर (ता. हवेली, जि.पुणे) अंतर्गत तुकडा बंदी असतांना देखील तलाठी नोंदी करीत असल्याचे निदर्शनास आले असून त्याबाबत माहिती मिळण्यासाठी तहसिलदार, हवेली यांच्याकडे दिनांक २ जून, २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२२-१२-२०२०) :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आल्याचे दिसून येत नाही.

(३) हे खरे आहे. तथापि, तुकडा बंदी नोंदी संदर्भात सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क.५८ दिनांक ७ सप्टेंबर २०१७ मधील सुधारित तरतुदीनुसार नियमोचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोळंबी (ता.मंगरुळपीर,जि.वाशीम) येथे अवैध वाहतूक करत असलेले तांदळाचे ट्रक पकडल्याबाबत

**(२८) ११४४७ (१०-०८-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळंबी (ता.मंगरुळपीर, जि.वाशीम) येथे दिनांक २० जून, २०२० रोजी वा त्यासुमारास तांदुळाची अवैधरित्या वाहतूक करीत असलेले तीन ट्रक महसुल विभागासह पोलिसांनी पकडून २५ टन तांदूळ जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) तसेच लावणा फाटा (ता.मंगरुळपीर, जि.वाशीम) येथे दिनांक १६ जून, २०१९ रोजी वा त्या सुमारास पोलिसांनी अवैधरित्या वाहतूक करणारे तांदुळाचे चार ट्रक पकडले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ट्रक पकडल्यानंतर त्यांच्यावर शासनाच्या कलम ३ व ७ अन्वये जीवनावश्यक वस्तू अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरहू ट्रकमधील माल कुठून आला व तो कुठे पाठवला जात होता याबाबत चौकशी करून संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२५-०८-२०२०) :** (१) कोळंबी (ता.मंगरुळपीर,जि.वाशीम) येथे दिनांक २० जून, २०२० रोजी वा त्या सुमारास ३ ट्रक पकडण्यात आले नसून १ ट्रक पकडण्यात आला आहे.

(२) लावणा फाटा (ता.मंगरुळपीर,जि.वाशीम) येथे दिनांक १६ जून, २०१९ रोजी अवैधरित्या वाहतूक करणारे तांदुळाचे चार ट्रक पकडण्यात आले नसून २ मिनी ट्रक पकडण्यात आले आहेत.

(३) दोन्ही ठिकाणी पकडलेल्या अवैध तांदुळ वाहतुकीबाबत आरोपीतांविरुध्द कलम ३, ७ अत्यावश्यकवस्तु अधिनियम १९५५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्ह्यांचा तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ओझर मिग (ता. निफाड, जि. नाशिक) हे पोलीस स्टेशन ग्रामीण विभागातुन शहरी विभागास न जोडण्याबाबत**

**(२९) ११४८५ (१३-०९-२०२०). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओझर मिग (ता. निफाड, जि. नाशिक) येथील पोलीस स्टेशन हे ग्रामीण विभागांतर्गत येत असून हे पोलीस स्टेशन ग्रामीण विभागातुन शहरी विभागास जोडण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पोलीस स्टेशन शहरी भागास जोडण्यात येऊ नये अशी मागणी निफाड तालुक्यातील नागरिक, ओझर ग्रामपालिका, निफाड वकील संघ तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त मागणीच्या अनुषंगाने सदरचे पोलीस स्टेशन शहरी भागास जोडण्यात येउ नये या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अनिल देशमुख (०५-०१-२०२१) :** (१), (२) व (३)

पोलीस अधीक्षक,नाशिक ग्रामीण यांच्या आस्थापनेवरील ओझर पोलीस ठाणे, पोलीस आयुक्त,नाशिक शहर यांच्या आस्थापनेवर वर्ग करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस आयुक्त,नाशिक शहर यांनी दि.१२.११.२०१९ रोजीच्या पत्रान्वये पोलीस महासंचालक कार्यालयास सादर केला होता. पोलीस आयुक्त,नाशिक शहर व पोलीस अधीक्षक,नाशिक ग्रामीण हद्दीमध्ये बदल करून कार्यक्षेत्राची पुनर्रचना करण्यासंदर्भात पोलीस अधीक्षक,नाशिक ग्रामीण, पोलीस आयुक्त,नाशिक शहर व विशेष पोलीस महानिरीक्षक,नाशिक परिक्षेत्र या तिन्ही एकत्रित शिफारशीसह अहवाल पाठविण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाने संबधिताना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साक्री (जि.धुळे) तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुधन विकास अधिकारी यांची पदे भरण्याबाबत**

**(३०) ११६०५ (१५-०९-२०२०). श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील श्रेणी २ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांचा दर्जा श्रेणी १ मध्ये करण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू श्रेणीच्या दर्जामध्ये वाढ झाल्यानंतर किती नविन पदे निर्माण करण्यात येणार असुन सद्यस्थितीत असलेल्या पशुवैद्यकीय दवाखान्यांत एकूण मंजुर पदे व रिक्त पदे किती आहेत,

(३) असल्यास, असल्यास, साक्री (जि.धुळे) तालुक्यातील श्रेणी १ पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुधन विकास अधिकारी, गट अ या संवर्गातील किती पदे रिक्त आहेत,

(४) असल्यास, सदरहू रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा याबाबतची सध्यस्थिति काय आहे ?

**श्री. सुनिल केदार (०७-०१-२०२१) : (**१) व (२) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे. नविन पदांबाबत सदरहू श्रेणीच्या दर्जामध्ये वाढ झाल्यानंतर आवश्यकतेनुसार तपासून घेणे अपेक्षित आहे. सद्यस्थितीत राज्यामध्ये पशुधन विकास अधिकारी संवर्गाची मंजूर पदे २१९२ असून भरलेली पदे १६६१ व रिक्त पदे ५३२ आहेत. सहाय्यक पशुधन विकास अधिकारी गट-क संवर्गामध्ये मंजूर पदे ७४९ असून भरलेली पदे ५०५ व रिक्त पदे २४४ आहेत. तसेच पशुधन पर्यवेक्षक गट-क संवर्गामध्ये मंजूर पदे ३४०९ असून भरलेली पदे २५१८ व रिक्त पदे ८९१ आहेत.

(३) तालुका साक्री जि. धुळे येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ मधील पशुधन विकास अधिकारी गट-अ या संवर्गाची १५ पदे रिक्त आहेत.

(४) पशुधन विकास अधिकारी (गट- अ) यांची ४३५ रिक्त पदे सरळ सेवा भरतीने भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची जाहिरात दि. २३.०८.२०१९ नुसार कार्यवाही सुरु करण्यात आली असून दि.२२.१२.२०१९ रोजी चाळणी परीक्षा घेण्यात आली आहे. सरळसेवा भरतीची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून पूर्ण झाल्यानंतर पशुधन विकास अधिकारी गट- अ या संवर्गातील रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील नगर भूमापन कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३१) ११६३५ (१३-०९-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील नगर भूमापन कार्यालयातील मंजूर पदापैकी ५० टक्के जागा रिक्त असल्याने सदर रिक्त पदे भरण्यासाठी लोकप्रतिनिधीनी मा.महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक १४ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास नगर भूमापन अधिकारी यांच्याकडे दिनांक

२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास तसेच जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, ठाणे व उपसंचालक, भूमिअभी लेख, कोकण प्रदेश मुंबई यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यक्षेत्रात सुमारे ३० ते ३५ हजार मिळकती आहे व फक्त दोनच परीक्षण भूमापक असून त्यांच्याकडील मोजणीकाम, फेरफार इत्यादी कामाचा व्याप वाढला असल्याने नागरिकांची कामे पूर्ण होत नाही तसेच मोठ्या प्रमाणावर तक्रारी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कार्यालयातील एकूण शासकीय कामाचा आवाका विचारात घेता उपलब्ध कर्मचाऱ्याकडून शासकीय कामाचा निपटारा मुदतबाह्य होत असल्यामुळे जनतेच्या तक्रारी वाढत असून अपुऱ्या पदांमुळे येथील कामाचा फार मोठा प्रश्न निर्माण होत असल्याचे आढळून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात (११-०१-२०२१) :** (१) श्री. कुमार आयलानी, विधानसभा सदस्य, उल्हासनगर यांचे नगर भूमापन अधिकारी, उल्हासनगर कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबतचे दि. ०२.०२.२०२० चे पत्र नगर भूमापन अधिकारी, उल्हासनगर, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, ठाणे तसेच उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांचेकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. मात्र, श्री. आयलानी, वि.स.स. यांनी नगर भूमापन कार्यालय, उल्हासनगर येथील रिक्त पदे भरण्याबाबतचे, मा. मंत्री (महसूल) महोदयांना दिनांक ०५.०३.२०२० अन्वये दिलेले पत्र या विभागास प्राप्त झालेले आहे.

(२) नगर भूमापन अधिकारी उल्हासनगर यांचे कार्यक्षेत्रामध्ये एकूण ३०,६२४ मिळकती असून सदर कार्यालयात परिरक्षण भूमापकाची एकूण ४ पदे मंजूर आहेत. रिक्त असणारे एका पदावर उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांचेकडील दिनांक १०.०६.२०२० चे आदेशानुसार नियुक्ती देण्यात आलेली असून सदर कर्मचारी हे दिनांक ०२.०७.२०२० रोजी हजर झालेले आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत एकही पद रिक्त नाही. तथापि, एका पदावरील कर्मचारी ह्या कर्करोग झाल्यामुळे दिनांक २६.१०.२०१९ पासून दिर्घ मुदतीच्या वैद्यकीय रजेवर आहेत. उपलब्ध ३ परिरक्षण भूमापक यांचेकडून मोजणीकाम, फेरफार नोंद इत्यादी नागरीकांची कामे मुदतीत करण्यात येत असून प्रलंबित कामाचा निपटारा करण्यात आलेला आहे. त्यामुळे जनतेच्या तक्रारी येण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) नगर भूमापन अधिकारी, उल्हासनगर या कार्यालयातील दिवसेंदिवस कामाची वाढ होत आहे. त्यांचे कार्यालयातील शिरस्तेदार संवर्गातील २ पदे पदोन्नतीने भरण्यात आली असून रिक्त असणारे १ परिरक्षण भूमापकाचे पद देखील दिनांक १०.०६.२०२० चे आदेशान्वये भरण्यात आलेले आहे. उपलब्ध ३ परिरक्षण भूमापक यांचेकडून मोजणीकामे, फेरफार नोंद इत्यादीबाबतची कार्यवाही मुदतीत करुन घेण्यात येत असून प्रलंबित कामाचा निपटारा करणेत आला आहे. तसेच इतर कार्यालयीन कामकाज नियमित होत आहे.

(४) व (५) उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांच्या दिनांक १७.०७.२०१९ व ०८.०५.२०२० रोजीच्या आदेशाने नगर भूमापन अधिकारी, उल्हासनगर कार्यालयातील शिरस्तेदार क्र. १ व २ ही पदे पदोन्नतीने भरण्यात आलेली असुन सदर पदांवरील कर्मचारी हे अनुक्रमे दि. ०४.०२.२०२० व दि. १४.०५.२०२० रोजी हजर झालेले आहेत. गट ड संवर्गातील नाईक पदावरील कर्मचारीदेखील दिनांक ०७.०१.२०२० रोजी हजर झालेले आहेत. तसेच दिनांक १०.०६.२०२० रोजीचे पदोन्नती आदेशान्वये रिक्त असलेले १ परिरक्षण भूमापकाचे पद देखील भरण्यात आलेले आहे. त्यामुळे आज रोजी सदर कार्यालयात परिरक्षण भूमापक संवर्गातील एकही पद रिक्त नाही. सद्यस्थितीत प्रस्तुत कार्यालयात गट क पदसमुह ४ संवर्गातील १ पद व गट ड शिपाई संवर्गातील ४ पदे अशी एकुण ५ पदे रिक्त आहेत. कामकाजाचा आढावा घेवून उपलब्ध कर्मचाऱ्यांमधुन सदर पदे नियतकालीक बदलीवेळी भरण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

---

**चामोर्शी (जि. गडचिरोली) तालुक्यातील तहसिलदार यांनी कोवीड-१९ च्या कालावधीत केलेला गैरव्यवहार**

**(३२) ११९८५ (१३-०९-२०२०). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चामोर्शी (जि. गडचिरोली) तालुक्याचे तहसिलदार यांनी कोरोना महामारीच्या कालावधीत शासनातर्फे करावयाच्या प्रतिंबधात्मक उपाययोजना, औषधी व जीवनावश्यक वस्तूचे वाटप योग्य प्रकारे न केल्याचे माहे मे-जून, २०२० या कालावधीत निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चामोर्शी तालुक्यातील सन २०१९-२० व त्यापुर्वीची नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांना वाटप करतांना अंदाजे ५७ लक्ष रुपयाचा तहसिलदार यांनी गैरव्यवहार केल्याचे जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या निदर्शनास आल्यावर त्याबाबत चौकशी सुरु करण्यात आली असताना अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चामोर्शी तालुक्याचे तहसिलदार यांच्यावर तातडीने कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच त्यांना निलंबीत करुन विभागीय चौकशी प्रस्तावीत केली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२८-१२-२०२०) :** (१) विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या अहवालानुसार अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) सन २०१९-२०२० साठी अतिवृष्टीमुळे झालेल्या घरांच्या अशंतः/पूर्णतः नुकसानीच्या वाटपासाठी तहसीलदार चामोर्शी यांना एकूण रु. ५७,७४,७००/- इतके अनुदान प्राप्त झाले होते. त्यापैकी तहसिलदार चामोर्शी यांनी रक्कम रु. २९,०३,३२५/- आपत्तीग्रस्तांच्या बँक खात्यात जमा केली असून उर्वरित रक्कम रु. २८,७१,३७५/-शासन जमा करण्यात आली आहे. त्यामुळे

यात कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हवेली (जि.पुणे) तालुक्यातील उपअधिक्षक भूमिअभिलेख कार्यालय येरवडा येथे शासकीय रकमेचा झालेला अपहार

**(३३) १२१३२ (१३-०९-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील उपअधिक्षक भूमिअभिलेख कार्यालय येरवडा येथील कार्यालय प्रमुखांनी प्रॉपर्टी कार्ड ऑनलाईन करण्यासाठी जमाबंदी आयुक्त यांनी दिलेल्या शासनाच्या सरासरी ५ लाख रुपयांचा अपहार माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची रक्कम ही कुठल्याही शासकीय नियमांचे पालन न करता श्रीमती गौड मॅडम, उपअधिक्षक भूमिअभिलेख व वरिष्ठ लिपिक भांगरे यांनी कर्मचाऱ्यांना चेक देणे सोईचे असतानाही बँकेतून कॅश काढून घेतली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, श्रीमती गौड यांचा उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय हवेली येथील तीन वर्षाचा कार्यकाल पूर्ण झालेला असून त्या बदलीस पात्र असतानाही त्यांची पुणे विभागाबाहेर बदली झाली नाही, करोना विषाणूच्या काळात बिल्डर लॉबीचे अनेक मोजणी प्रकरणे निकाली काढून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. बाळासाहेब थोरात (११-०१-२०२१) :** (१) शासकीय रक्कम खर्च करताना वित्तीय अनियमितता झालेली आहे, असे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे सदर प्रकरणी तपास सुरु करण्यात आला आहे.
(२) होय.
(३) श्रीमती गौड यांचा उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, हवेली येथील तीन वर्षाचा कार्यकाल पूर्ण झालेला असून त्या बदलीस पात्र असल्याने त्यांची पुणे विभागाबाहेर उप अधीक्षक भूमि अभिलेख, तळा, जि.रायगड या पदावर दिनांक १०.०८.२०२० च्या आदेशान्वये बदली करण्यात आलेली आहे. त्यांची बदली केली असली तरी त्या अद्याप बदलीच्या ठिकाणी हजर झालेल्या नसल्याने जमाबंदी आयुक्त, कार्यालयाच्या आदेश क्र.आस्था/प्र.क्र.२४४/२०२०/ आ-१, पुणे, दिनांक २३.०९.२०२० अन्वये दि. ११.०८.२०२० ते दि. १४.०९.२०२० पर्यंतचा अनधिकृत गैरहजेरीचा कालावधी सेवेतील खंड म्हणून घोषित करण्यात आला आहे.

कोरोना विषाणूच्या काळात बिल्डर लॉबीची अनेक मोजणी प्रकरणे निकाली काढून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केलेला असल्याबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही. तक्रार प्राप्त झाल्यास चौकशी करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.
(४) जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे यांच्याकडून उप अधीक्षक, भूमि अभिलेख, हवेली या कार्यालयास दि. १४.०३.२०१९ च्या आदेशान्वये रु.४,६५,७४०/- इतक्या रकमेचा धनादेश अदा करण्यात आला होता. सदर धनादेशाची रक्कम कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर दबाव आणून

आहरण व वित्तीय नियमावलीचे उल्लंघन करुन सदर रक्कम रोख मिळालेबाबत संबधितांची सहीनिशी पोहोच घेऊन बनावट अभिलेख तयार केला.

या व इतर अनियमिततेच्या अनुषंगाने श्रीमती गौड यांना जमाबंदी आयुक्त, पुणे यांच्या क्र.आस्था/ एस.आर./आ-३/२०२०, दिनांक १२.११.२०२० च्या आदेशान्वये निलंबीत करण्यात आले असून, श्रीमती गौड व इतर संबधीत कर्मचारी यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम ८ व नियम १२ अन्वये दिनांक ११.०३.२०२० अन्वये दोषारोप बजावून त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

---

**वळती - सवणा (ता.चिखली, जि. बुलडाणा) या रस्त्यावरील**
**अवैध बांधकाम तोडून रस्ता मोकळा करण्याबाबत**

**(३४) १२५९९ (१३-०९-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वळती सवणा (ता.चिखली, जि. बुलडाणा) ह्या रस्त्यावर गैरमार्गाने अवैध बांधकाम केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जमिनीचा एनए (अकृषक) सुद्धा अवैध झालेला असून रस्त्यावर केलेले अवैध बांधकाम तोडून रस्ता मोकळा करावा अशी मागणी श्री अरुण माणिकराव पाटील, रा.सवणा फाटा व इतर चिखली (ता.चिखली, जि. बुलढाणा) यांनी दिनांक १६ डिसेंबर, २०१५, १८ फेब्रुवारी, २०१९ यांनी दिनांक २१ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी बुलढाणा, तहसीलदार, चिखली यांच्याकडे लेखी स्वरूपात केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रार करुनही अद्यापि सदर रस्ता मोकळा झालेला नसून दोषींवर कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याबाबतची कारणे कोणती आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२९-१२-२०२०) :**

१), २), ३) व ४) श्री. अरुण माणिकराव पाटील व इतर यांनी दिनांक १६/१२/२०१५ व दिनांक २०/०१/२०२० रोजी वळती-सवणा, ता. चिखली, जि. बुलडाणा या रस्त्यावर गैरमार्गाने अवैध बांधकाम झाले असून त्यांचे जाणे-येणे बंद झाले असल्याबाबत तहसिलदार, चिखली यांचेकडे तक्रारी दाखल केल्या आहेत. त्याअनुषंगाने नायब तहसिलदार, चिखली यांनी दि. २६/०५/२०२० रोजीच्या पत्रान्वये चिखली- वळती-पानंद रस्त्याचा मोजणी अहवाल सादर करण्याबाबत उप अधिक्षक, भुमी अभिलेख, चिखली यांना कळविले आहे.

प्रश्नाधीन रस्त्यावर अतिक्रमण आहे किंवा कसे? याबाबत उप अधिक्षक, भुमी अभिलेख, चिखली यांचेकडून मोजणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणी प्रचलित शासकीय नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

**दहिसर पश्चिम (मुंबई) लिंक रोड जवळील कांदरपाडा येथील खारफुटीची अवैध तोड सुरू असल्याबाबत**

**(३५) १२९१५ (१३-०९-२०२०). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) दहिसर पश्चिम (मुंबई) लिंक रोड जवळील कांदरपाडा येथील खारफुटीची तोड सुरु असल्याचे दिनांक ५ मे २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्वीपेक्षा काही भागात खारफुटीची दाटी कमी झाली असल्याने तेथे जाणाऱ्या लोकांची आणि गाड्यांची संख्या अचानक वाढली व काही वेळा ड्रमची वाहतूक होत असल्याचेही स्थानिकांनी निदर्शनास आणले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खारफुटीची अवैध होत असलेली तोड थांबवण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१७-१२-२०२०) :** (१), (२), (३) व (४) मौजे दहिसर पश्चिमेला कांदरपाडा येथे खारफुटीच्या परीसरामध्ये लोकांची व गाड्यांची संख्या अचानक वाढल्याबाबतची बातमी दि.०६.०५.२०२० रोजी महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रातून प्रसिध्द झाली होती.

त्यानुषंगाने महसूल विभागाच्या ताब्यातील क्षेत्राबाबत तहसिलदार, बोरीवली यांनी या जागेची स्थळ पाहणी केली असून, त्यानुसार दलदल, तिवरांची झाडे दिसून येत असून, या ठिकाणी कांदळवनाची तोड झाल्याचे दिसून आले नाही. तसेच सदर ठिकाणी गाड्यांची आणि ड्रमची वाहतुक होत नसल्याचे स्थळ पाहणीच्यावेळी निदर्शनास आलेले नाही, असा अहवाल दिला आहे. तसेच वन विभागाच्या ताब्यातील दहिसर व कांदरपाडा येथील अधिसूचीत कांदळवन क्षेत्रामध्ये तोड झाल्याचे दिसून आलेले नाही असा अहवाल कांदळवन कक्ष, मुंबई यांनी सादर केला आहे.

---

**वर्धा जिल्ह्यातील मौजा विरूळ (ता.आर्वी ), मौजा अंतोरा व मौजा साहुर (ता.आष्टी) व मौजा बांगडापुर (ता.कारंजा) येथे पोलीस चौकी स्थापन करण्याबाबत**

**(३६) १३०३१ (१७-०७-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील मौजा विरूळ (ता.आर्वी), मौजा अंतोरा व मौजा साहुर (ता.आष्टी) व मौजा बांगडापुर (ता.कारंजा) येथे नवीन पोलीस चौकी निर्माण करण्याबाबत लोकप्रतीनीधी यांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गावे जिल्हा परिषद सर्कलची मोठी गावे असून या प्रत्येक गावाच्या परिसरात २० ते २५ खेड्यांचा समावेश आहे तसेच ही गावे नागपूर-अमरावती सीमेलगत असून यामार्गाने मद्याचा अवैध पुरवठा केल्या जात असल्याने या गावात पोलिस चौकी आवश्यक असून त्यामुळे परिसरातील अवैध धंद्यास प्रतिबंध बसेल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून उपरोक्त गावात पोलिस चौकी निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येतआहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२८-१२-२०२०) :** (१), (२) व (३) वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यातील मौजा विरूळ हे गाव पोलीस स्टेशन पुलगाव अंतर्गत पोलीस दूरक्षेत्र रोहना येथून ८ कि.मी अंतरावर आहे. तसेच आष्टी तालुक्यातील मौजा अतोरा हे गाव पोलीस स्टेशन आष्टी पासून १४ कि.मी अंतरावर अमरावती जिल्हयाचे सीमेलगत आहे. कारंजा तालुक्यातील मौजा बांगडापुर हे गाव पोलीस स्टेशन कांरजा पासून २० कि.मी अंतरावर असून नागपूर जिल्हयाचे सीमेलगत आहे. सदर तीनही गांवामध्ये दाखल गुन्हयांचे प्रमाण कमी आहे. सबब उपरोक्त नमूद ठिकाणी पोलीस चौकीची आवश्यकता नाही.

मौजे साहुर हे गांव पोलीस स्टेशन आष्टी, जि.वर्धा अंतर्गत असून सदर ठिकाणी पोलीस चौकी निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक,वर्धा यांनी पोलीस महासंचालक कार्यालयास सादर केलेल्या प्रस्तावाचा महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या सुधारित आकृतीबंध अहवालात समावेश करण्यात आला आहे. सद्यस्थितीत पोलीस महासंचालक कार्यालयाने सादर केलेला महाराष्ट्र राज्य पोलीस दलाचा सुधारित आकृतीबंध वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र पोलीस विभागातील ५० वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या पोलीस कर्मचा-याना करोना कालावधीत बंदोबस्त न देता कार्यालयात सेवा देण्याबाबत

**(३७) १३०६६ (१३-०९-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोलीस विभागातील ५० वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या पोलीस कर्मचा-याना कोविड - १९ चा प्रादुर्भाव होऊ नये याकरिता बंदोबस्त न देता कार्यालयात सेवा देण्याबाबत शासनाने दिनांक २८ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्रकान्वये सर्व संबंधिताना कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तरीसुद्धा ५० वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या अनेक पोलीस कर्मचाऱ्यांना बंदोबस्त देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून ५० वर्षापेक्षा अधिक वय असलेल्या कर्मचाऱ्यांना

बंदोबस्त न देण्याबाबत तसेच शासकीय आदेशाची अवहेलना करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (०७-०१-२०२१) : (**१) जास्त वयाच्या पोलिस अधिकारी/कर्मचारी यांच्यामध्ये कोव्हीड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रार्दुभाव होऊ नये, याकरिता पोलिस खात्यातील ५५ वर्ष वयोगटातील पोलिस अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयीन ड्युटी देण्यात यावी. तसेच त्यांनी आरोग्याच्या स्थितीमुळे रजा मागीतल्यास त्यांना रजा देण्यात यावी. त्यांचा जनतेशी संपर्क येणार नाही अशा ठिकाणी त्यांना नेमणूक देण्यात यावी. तसेच विविध व्याधी असलेल्या ५०-५५ वर्षे वयोगटातील पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांचा जनतेशी संपर्क येणार नाही अथवा कमी संपर्क येईल अशा ठिकाणी नेमणूक देण्याबाबत पोलीस महासंचालक, मुंबई यांचे कार्यालयाचे दि.२८.०४.२०२० च्या परिपत्रकान्वये सर्व पोलीस घटक प्रमुखांना कळविण्यात आले आहे.
(२) असे निदर्शनास आले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात तालुका क्रीडा संकुलासाठी देण्यात येणाऱ्या निधीत वाढ करण्याबाबत**

**(३८) १३०७१ (१४-०९-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रत्येक तालुक्यात तालुका क्रीडा संकुल उभारण्याचा निर्णय शासनाने शासन निर्णय क्र.राक्रीधो/२००३/प्रक्र-११/क्रीयुसे-१, दिनांक २६ मार्च २००३ अन्वये घेतला असून या योजनेनुसार तालुका क्रीडा संकुल उभारण्यात येणार असून शासनाकडून याकरिता रुपये १ कोटी पर्यन्त आर्थिक सहाय्य दिले जाणार असल्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, क्रिडा संकुलासाठी देण्यात येणाऱ्या निधीची मर्यादा वाढवून सुमारे ५ कोटी करण्याची मागणी लोकप्रतीनिधिनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने तालुका क्रीडा संकुलासाठी देण्यात येणाऱ्या निधी रुपये १ कोटी वरून ५ कोटी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (१७-१२-२०२०) :** (१) होय,
सदर योजनेअंतर्गत तालुका क्रीडा संकुलासाठी रू. १ कोटी अनुदान मंजूरीबाबत आदेश शासन निर्णय, दि. २१ मार्च, २००९ अन्वये दिले आहेत.
(२) होय.
(३) यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यात दरोडे, चो-या इत्यादीचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(३९) १३१११ (१३-०९-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यात दरोडे, चो-या इत्यादीचे प्रमाण वाढल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी स्थानिक नागरिकांनी संबंधित पोलीस स्थानकात तक्रारी नोंदवूनही दरोडे व चोऱ्यांवर नियंत्रण मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दरोडे व चोरींवर नियंत्रण मिळविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसलेल्या, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१७-१२-२०२०) :** (१) व (२) माहे एप्रिल, २०२० मध्ये श्रीगोंदा तालुक्यात चोरी सदराखाली ८ व दरोडा सदराखाली २ असे एकूण १० गुन्हे दाखल आहेत. तत्सम कालावधीशी तुलना करता माहे एप्रिल, २०१९ मध्ये एकूण २५ गुन्हे दाखल होते.

माहे एप्रिल, २०२० मध्ये दरोड्याचे २ गुन्हे उघडकीस आले असून त्यात ४ आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून रु. ४०००/- चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच चोरीचे ३ गुन्हे उघडकीस आले असून त्यात ५ आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून रु. ४७०००/- चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

(३) दरोडे व चोरीच्या गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यासाठी कोम्बिंग ऑपरेशन, प्रभावी नाकाबंदी व रात्रगस्त (पेट्रोलिंग) करुन तसेच गुप्तबातमीदारांमार्फत माहिती प्राप्त करुन गुन्ह्यांवर नियंत्रण मिळविण्यात येत आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**मौजे मांडवगण , विसापूर व काष्टी ( ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर ) येथील पोलिस दूरक्षेत्र सुरु करण्याबाबत**

**(४०) १३३२८ (२१-०८-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मांडवगण, विसापूर व काष्टी ( ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर ) येथील पोलिस दूरक्षेत्र कायमस्वरूपी बंद करण्यात आल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे पोलिस दूरक्षेत्र बंद असल्याने या भागात मोठ्या प्रमाणात अवैध धंदे

व चो-या होण्याच्या प्रमाणात वाढ झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त पोलीस दूरक्षेत्र पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अनिल देशमुख (१०-१२-२०२०) :** (१), (२) श्रीगोंदा पोलीस ठाणे यांचे हद्दीतील मांडवगण दूरक्षेत्र व बेलवंडी पोलीस ठाणे यांचे हद्दीतील विसापूर हे दूरक्षेत्र सुरू असून श्रीगोंदा पोलीस ठाणे यांचे हद्दीतील काष्टी हे बीट सुरू आहे.

सदरचे पोलिस दूरक्षेत्र सुरू असल्याने या भागात अवैध धंदे व चो-या होण्याच्या प्रमाणात वाढ झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात टोमॅटो पिकावर विषाणुजन्य रोगाचा झालेला प्रादुर्भाव

**(४१) १३३७९ (१४-०९-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विषाणूची लागण झाल्यामुळे टोमॅटो काढल्यानंतर एकाच दिवसात खराब होत असल्याने टोमॅटोची शेती करण्यासाठी किमान एक वर्ष टोमॅटोची लागवड बंद करण्याचा निर्णय दिनांक ७ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनाने घेतला असुन विषाणूमुळे पुणे, नाशिक, कोल्हापूर या जिल्हयांतील सुमारे दहा हजार एकर क्षेत्रातील टोमॅटोचे पिक धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अकोला व संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यांतील शेकडो शेतकऱ्यांच्या टोमॅटोच्या पिकांवर गुढ वायरसची बाधा झाल्यामुळे शेतकऱ्यांचे १५ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असुन त्याबाबत शेतकऱ्यांनी लेखी तक्रार केल्यानंतर महात्मा फुले कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी पाहणी करुन नुकसानग्रस्त पिकांचे नमुने घेऊन तपासणीसाठी बेंगलोरला पाठविले असता बेंगलोरच्या प्रयोग शाळेतून आलेल्या अहवालाशी शेतकरी सहमत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अचूक व समाधानकारक निदान उपलब्ध करुन पीक नुकसानीचे पंचनामे करावेत व नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी किसान सभेच्या वतीने मा.मुख्यमंत्री यांचेकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, टोमॅटोचे पिक वाचविण्यासाठी मागील तीन वर्षापासून सुरु असलेल्या तपासणीअंती विषाणूवर उपाय करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१९-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

टोमॅटो पिकावरील विषाणुजन्य रोगाचा प्रादुर्भावानंतर शेतक-यांच्या तक्रारी आधारे तालुका तक्रार निवारण समितीने संयुक्त पाहणी केली तसेच रोगग्रस्त झाडांचे नमुने विश्लेषणासाठी बेंगलोर येथे पाठवुन विश्लेषण अहवाल प्राप्त करुन घेतला आहे. तालुका तक्रार निवारण समितीचा टोमॅटो पिकाचे नुकसान झाल्याचा अहवाल तसेच बेंगलोर येथील विश्लेषण अहवाल तक्रारदार शेतक-यांना दिला आहे. तथापि तक्रारदार शेतकरी बेंगलोर येथील संस्थेच्या अहवालाबाबत समाधानी किंवा असमाधानी असलेबाबत कोणतेही लेखी निवेदन उपविभागीय कृषि अधिकारी संगमनेर यांच्या कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(३) सदरील मागणीबाबतचे निवेदन प्राप्त झाल्याचे अभिलेखात दिसून आले नाही.

(४) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांचे कडुन प्राप्त कृषि सल्ला टोमॅटो उत्पादक शेतक-यांना देण्यात आला. हॉर्टसॅप योजनेत टोमॅटो पिकाचा समावेश करण्यात आला असुन टोमॅटो उत्पादकांना प्रशिक्षण देणेकामी शेतीशाळेचे आयोजन करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील बियाणांचे वाढीव दर कमी करण्याबाबत**

**(४२) १३८३४ (१४-०९-२०२०). श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात यंदाच्या खरीप हंगामात महाबीजने सोयाबीन बियाणांच्या ३० किलोच्या बॅग मागे तब्बल ७५० ते ८०० रुपये दरवाढ केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पावसामुळे शेतकरी संकटात असताना बियाणे दरवाढीमुळे शेतक-यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बियाणांची वाढीव दर कमी करण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी शासनाकडे माहे जुन, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१९-०१-२०२१) :** (१) व (२) अंशत: खरे आहे,

राज्यात सोयाबीन पिकाच्या बाबतीत बिजोत्पादन कार्यक्रम हा एक वर्ष अगोदर राबविला जातो. खरीप हंगाम २०१९-२० मध्ये सप्टेंबर, ऑक्टोबर या महिन्यात सोयाबीन काढणीच्या अवस्थेत झालेल्या पावसामुळे काढणीला आलेले सोयाबीन खराब झालेले होते. त्यामुळे सोयाबीन बिजोत्पादन कार्यक्रमावर व गुणवत्तेवर विपरीत परिणाम झाला होता.

सन २०२० या वर्षातील खरीप हंगामात शेतक-यांना बियाणे उपलब्ध व्हावेत याकरिता बिजोत्पादक शेतकऱ्यांकडून कच्चे बियाणे हे २१.५ टक्के या वाढीव दरात खरेदी करण्यात आलेले होते. बाजारातील सोयाबीनचे वाढलेले दर, नापास बियाण्यांचे अधिक प्रमाण, तुटवडा सदृष्य परिस्थिती इ. अपरिहार्य कारणामुळे महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (महाबिज), अकोला यांच्या सोयाबीन बियाणांच्या सन २०१९-२० मध्ये रु.१८६०/- असलेल्या

बॅगची किंमत ही सन २०२०-२१ मध्ये रु.२२५०/- इतकी झालेली होती. सदरची वाढ ही २१ टक्के असून बिजोत्पादक शेतकऱ्यांकडून कच्चे बियाणे हे वाढीव दराने घेतल्यामुळे ही माफक प्रमाणात दर वाढ झालेली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) खरीप हंगाम २०२० मध्ये शेतकऱ्यांना खते, बियाणे उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शासनाने गुणवत्ता नियंत्रण व सुरळीत पुरवठा होण्याच्या दृष्टीने बांधावर खते, बियाणे पोचविण्याची योजना हाती घेतलेली आहे. राज्यात खरीप हंगाम २०२० मध्ये १४० लाख हेक्टर क्षेत्रावर खरीपाची पेरणी झालेली आहे. मागील वर्षीच्या ३९ लाख हेक्टर क्षेत्राच्या तुलनेत यावर्षी ४२.५६ लाख हेक्टरवर सोयाबीनची पेरणी झालेली आहे. शेतकऱ्यांना गुणवत्तांपूर्ण कृषि निविष्ठा वेळेवर उपलब्ध करुन देण्यासाठी शासन कटीबद्ध आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोंदिया जिल्हयातील शेतामधील धान पिकांवर मावा तुडतुडया रोगाचा प्रादुर्भाव झाल्याबाबत**

**(४३) १४५९० (१४-०९-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.इंद्रनिल नाईक (पुसद) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालेकसा, अर्जुनी मोरगांव, गोरेगांव, आमगांव (जि.गोंदिया) व इतर तालुक्यांतील शेतामधील धानपिकांवर मावा तुडतुडया रोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किड रोगांच्या प्रादुर्भावासह खोडकिडा, करपा इत्यादी रोगाने जिल्हयातील धान उत्पादनात घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोंदिया जिल्हयात उन्हाळी धानाचे उत्पादन शेतकरी घेत असल्याने सदर रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१९-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे

(३) माहे एप्रिल व मे महिन्यात खोड किडा व करपा किड रोगाचा प्रादुर्भाव झालेला होता. याकरीता गावस्तरावर १०३८ गावबैठका घेण्यात आल्या तसेच ॲडवायझरी व वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आलेले होते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर जिल्हयात मुग पिकाच्या नुकसानीचे पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(४४) १४६४५ (१४-०९-२०२०). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयात मुग या पिकावर येलो मोझॅक व्हायरस या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने मुगाची पिके पिवळी पडुन शेंगा करपल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील नुकसानीचे पंचनामे करून नैसर्गिक आपत्तीअंतर्गत शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, यांनी जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे दिनांक ५ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१९-०१-२०२१) : (**१) अंशत: खरे आहे.

लातूर जिल्हयामध्ये मुग पिकाचे सर्वसाधारण क्षेत्र १३०६३ हेक्टर असुन प्रत्यक्ष पेरणी ११८४३ हेक्टर क्षेत्रावर झालेली आहे.

औसा तालुक्यात किल्लारी मंडळातील काही गावांतील ३६७ हे. वर येलो मोझॅक व्हायरस रोग मूग पिकावर प्रादुर्भाव झाला असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पिक संरक्षणाच्या उपाययोजना शेतकऱ्यांना सांगितल्या.

(२) हे खरे आहे.

(३) क्षेत्रीय कर्मचाऱ्यांकडून पीक संरक्षणाच्या उपाय योजना शेतकऱ्यांना सांगितल्या व शेतकऱ्यांना थायोमिथेक्सिम व लॅमडा सायलोथ्रीन ३ मिली प्रति १० लीटर पाण्यात टाकून फवारणीची शिफारस करण्यात आली होती. तसेच प्रमुख वर्तमान पत्रामध्ये याबाबत माहिती देण्यात आलेली होती. त्यामुळे सदर रोग आटोक्यात आला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाबाबत**

**(४५) १४८६० (१७-१२-२०२०). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प सुरु झाला असुन या योजनेत जी गावे समाविष्ट होणार नाहीत किंवा वैयक्तिक लाभापासून वंचित राहणाऱ्या शेतकऱ्यांनी शेतकरी कंपनी स्थापन केल्यानंतर त्यांना उक्त योजनेचा लाभ देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचप्रमाणे शासनाच्या आत्मा योजनेअंतर्गत राज्यात शेतकरी कृषी मंडळ, शेतकरी कृषी बचत गट स्थापन करणाऱ्यांना या योजनेत समाविष्ट करुन पोकराचा लाभ देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१८-०१-२०२१) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

(३) नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत काढणीपश्चात व्यवस्थापन व मूल्य साखळीचे बळकटीकरण करणे या घटकांतर्गत प्रकल्पांतर्गत जिल्हयातील शेतकरी उत्पादक कंपनी तसेच प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांतील स्वयं सहाय्यता गट/शेतकरी गट यांनी सादर केलेल्या व्यावसायिक प्रस्तावांना अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे. आत्मा योजनेंतर्गत नोंदणीकृत शेतकरी गटांना सदर प्रकल्पांतर्गत लाभ अनुज्ञेय आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भोर ( जि.पुणे ) तालुक्यातील पशुवैद्यकीय विभागातील रिक्त जागा भरण्यासह उपकेंद्राच्या इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत

**(४६) १८४८२ (२३-११-२०२०). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील पशुवैद्यकीय विभागातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या सुमारे ५० टक्के जागा रिक्त असल्याने शेतकऱ्यांच्या पशुधनास आरोग्यसेवा वेळेवर मिळत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच भोर येथील उपकेंद्राच्या इमारतींची दुरावस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्याअनुषंगाने भोर येथील पशुवैद्यकीय विभागातील रिक्त जागा भरण्यासह उपकेंद्राच्या इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (२८-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

भोर तालुक्यात राज्यस्तरीय १४ पशुवैद्यकीय दवाखाने व ११ जिल्हा परिषदेचे दवाखाने कार्यरत आहेत. सदर दवाखान्यावरील सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी व पशुधन पर्यवेक्षक या तांत्रिक अधिकारी व कर्मचा-यांची एकूण मंजूर २९ पदांपैकी १२ पदे रिक्त आहेत. याशिवाय गट-ड कर्मचा-यांची एकूण मंजुर २८ पदांपैकी ११ पदे रिक्त आहेत.

रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या अधिकारी / कर्मचारी यांचेकडे देण्यात येवून शेतक-यांच्या पशुधनास पशुवैद्यकीय सेवा वेळेवर पुरविण्यात येत आहेत. यासंदर्भात

विभागाकडे कोणतीही तक्रार प्राप्त नाही.
(२), (३) व (४)

भोर येथील तालुका लघु पशुसर्वचिकित्सालय ची इमारत जुनी असून ती सध्या वापरात आहे. तेथे अत्याधुनीक उपकरणांसह सुसज्ज इमारत बांधणे आवश्यक आहे. त्यासाठी जिल्हा नियोजन समिती अधिनस्त जिल्हा वार्षिक योजनेतून निधीची मागणी करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागास इमारतीच्या नवीन बांधकामाची अंदाजपत्रके सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

पशुधन विकास अधिकारी (गट-अ) यांची ४३५ रिक्त पदे सरळ सेवा भरतीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत कार्यवाही सुरु असून शिफारस यादी प्राप्त झाल्यानंतर आवश्यक कार्यवाही शासन स्तरावरुन करण्याचे संकल्पीत आहे.

गट-क पदभरतीबाबत सामान्य प्रशासन विभागाकडून निर्देश निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु असून ती कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर विहित प्रक्रियेनुसार पदभरती करण्याचे संकल्पित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोरेगांव (मुंबई) येथे तबेलेधारकांना नाममात्र भाड्याच्या बदल्यात देण्यात आलेल्या जागा ताब्यात घेण्याबाबत

**(४७) १९८४९ (२३-११-२०२०). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व परिसरातील नागरिकांना ताजे दूध पुरविण्यासाठी शासनाने गोरेगांव (मुंबई) येथे उभारलेल्या आरे डेअरी मध्ये आवश्यक दुधाचा नियमित पुरवठा होण्यासाठी या परिसरातील काही जागा नाममात्र भाडे आकारून ३० तबेले उभारण्याच्या तसेच या तबेल्यामध्ये जनावरे ठेवण्याच्या परवानगीसह सन १९५० मध्ये काही तबेलेधारकांना देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुधाचे दर वाढवून मिळत नसल्याच्या करणास्तव सदरहू तबेलेधारकांनी आरे डेअरीस दूध पुरवठा करण्याचे बंद केले असून सध्य: स्थितित सदरहू तबेलेधारक दुधाची खाजगिरीत्या विक्री करीत आहे, तसेच या तबेलेधारकांना दिलेल्या जागेवर काही बंगल्याचे बांधकाम करण्यात आलेले असून सदरहू बंगले चित्रीकरणाच्या कामाकरिता भाड्याने देऊन तबेलेधारक लाखों रुपये कमवत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाचे कोट्यवधी रूपयांचे महसुली नुकसान होत असल्याने सदरहू जागा व या जागेवर उभारलेले बंगले व निवासस्थाने ही संबधित तबेलेधारकांकडून काढून या जागेचा वापर जनहित योजनांसाठी करण्याबाबत तसेच सदरहू जागेची देखभाल करणे शासनास आर्थिक दृष्ट्या शक्य नसल्याने सदरहू जागा नोंदणीकृत सामाजिक व अशासकीय संस्थाना देखभालीकरीता देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाद्वारे माहे जानेवारी, २०२० मध्ये व त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरहू जागा ताब्यात घेण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. सुनिल केदार (०६-०१-२०२१) : (**१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

शासन निर्णय क्रमांक सीईओ-१०७७/१८११६/२२-पदुम, दिनांक ६.१०.१९७७ अन्वये परवानेधारकांना तबेल्यामध्ये उत्पादित होणारे दूध खुल्या बाजारात विक्री करण्यास शासनामार्फत परवानगी देण्यात आली आहे.

आरे दुग्धवसाहतीमधील विविध ३० गटात तबेल्यालगत एकूण १३९७ शासकीय निवासस्थाने आहेत. शासनामार्फत तबेलेधारकांना वाटप केलेल्या तबेल्यामध्ये तबेलेधारकांनी बंगले बांधलेले नाहीत. सन १९५३ च्या परिपत्रकानुसार आरे दुग्धवसाहतीतील तबेलेधारकांना त्यांच्या तबेल्याच्या बाजूला २० जनावरांच्या परवान्यामागे १ शासकीय निवासस्थान वाटप केले जाते.

तबेलेधारकांना वाटप केलेले शासकीय निवासस्थाने/बंगले चित्रीकरणाच्या कामाकरिता भाड्याने देऊन तबेलेधारक लाखो रुपये कमवत आहेत, ही बाब खरी नाही.
(३) स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२० मध्ये असे निवेदन दिले होते हे खरे आहे.
(४) सदर बाब तपासून घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वणी, मारेगांव व झरीजामणी (जि. यवतमाळ) तालुक्यातील नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उत्खनन होत असल्याबाबत.**

**(४८) १९९२७ (२३-११-२०२०). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी, मारेगाव व झरीजामणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील वर्धा, निगृडा, बेंबळा पैनगंगा नदी तसेच नाल्यातुन व लिलाव न झालेल्या वाळू घाटातुन महसूल विभागातील अधिकारी व वाळू तस्कर यांच्या संगनमताने अवैधरित्या वाळूची तस्करी होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वाळू तस्करीमुळे शासनाच्या कोटयवधी रुपयांच्या महसुलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन वाळू तस्करांवर व संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०५-०१-२०२१) :** (१), (२) व (३) यवतमाळ जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्याकरिता तहसिल स्तरावर भरारी पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे. सदरील पथकामार्फत तहसिलदार वणी, मारेगाव व झरीजामणी यांनी माहे एप्रिल, २०२० ते २५ नोव्हेंबर, २०२० या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध वाहतूकीच्या २७ प्रकरणात दंडात्मक कारवाई करुन रु.२५.९४ लक्ष एवढी रक्कम वसूल करण्यात आली असून ०६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिल्लोड (जि. औरंगाबाद) तालुक्यात अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत**

**(४९) १९९४९ (२३-११-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि. औरंगाबाद) तालुक्यात एकाही वाळूपट्ट्याचा लिलाव या वर्षी झालेला नसतानाही सिल्लोड परिसरासह अंजना नदी पात्रालगत असलेल्या वासडी, निंभोरा, देवपुळ, पळशी, किशोर, नादरपुर, जवखेडा इत्यादी गावातील स्थानिक वाळूमाफिया वाळूचा बेसुमार उपसा करत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अवैध वाळूमाफियांच्या यंत्रणेकडून पोलिसांवरच पाळत ठेवण्यात येत असल्याने पोलिस कारवाईत काहीही निष्पन्न होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार या अवैध वाळूमाफियांवर कारवाई करून अवैध वाळू उपसावर कायमस्वरूपी प्रतिबंध बसण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात (०५-०१-२०२१) :** (१), (२), (३) व (४) अंजना नदीपात्रालगत असलेल्या वासडी, निंभोरा, देवपुळ, पळशी, किशोर, नादरपुर, जवखेडा ही गावे कन्नड तालुक्यामध्ये येत असून अवैध गौण खनिजाच्या उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्याकरिता कन्नड तालुकास्तरावर भरारी पथकांची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर पथकांनी कन्नड तालुक्यात माहे एप्रिल, २०२० ते नोव्हेंबर, २०२० या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ३१ प्रकरणात रु.५१,२४,५३८/- एवढ्या दंडात्मक कारवाई करण्यात आली असून २१ गुन्हे दाखल करण्यात आली आहेत.

सिल्लोड तालुक्यात माहे एप्रिल, २०२० ते नोव्हेंबर, २०२० या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या १७ प्रकरणामध्ये रु.२८,५९,७००/- एवढी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळातील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन लागू करणे बाबत**

**(५०) २०२५५ (१०-१२-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजीच्या अधिसुचनेनुसार शासकीय कर्मचा-यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण ५५ महामंडळापैकी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ एक असून या महामंडळातील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,राज्यातील ५५ महामंडळापैकी महाराष्ट्र राज्य बियाणे मांडळा सारख्या आर्थिक दृष्टया परीपूर्ण असलेल्या अशा महामंडळांना ७ वा वेतन लागू करण्यास शासनाची नेमकी भूमीका काय आहे तसेच विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१९-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३)राज्य शासनाच्या अखत्यारीतील सार्वजनिक उपक्रमांना ७ वा वेतन आयोग लागू करणे ही धोरणात्मक बाब असून सदर धोरण राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निश्चित होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही वित्त विभागाकडे स्वतंत्रपणे सुरु आहे.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.